CMYK

# पार्श्वभूमी

बीड वर्ष ३६ वे अंक ९१ वा फोन २३०१०१ दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ शनिवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.




रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

# पंकजाताई बोलल्यामुळे सभापतींनी एका सचिवाला सस्पेंड केले ; आता बाकीचे सर्व आयएएस अधिकारी सरळ होणार




बीड दि.२७ (प्रतिनिधी):– संबंधीत खात्याचे अधिकारी जर त्या खात्याच्या मंत्र्यांनाच सहकार्य करीत नसतील, माहिती देत नसतील तर काय होऊ शकतं याचा प्रत्यय काल सभागृहात आला. पंकजाताई मुंडे यांच्या खात्याच्या संदर्भात चंद्रपूरच्या आमदारांना एक प्रश्न विचारला होता, त्यांना या प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही, तेंव्हा पंकजाताई सभागृहात म्हणाल्या की संबंधीत अधिकारी प्रदुषण महामंडळाचे सचिव आयएएस एम.देवेंद्रसिंग माहिती देत नाहीत, यावर सभापती तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी याची गंभीर दखल घेत देवेंद्रसिंग यांना निलंबीत करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य विधी मंडळाचे अर्थसंकल्प अधिवेशन सुरु असतांना एक मोठी घडामोड समोर आली आहे. प्रदुषण महामंडळाचे सचिव आयएएस अधिकारी एम देवेंद्रसिंग यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.
चंद्रपूरच्या आमदारांनी सभागृहात पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना पर्यावरणा संदर्भात एक प्रश्न विचारला होता, या प्रश्नाला त्यांना उत्तर देता आलं नाही. कारण आपल्याकडे याची माहिती नसल्याचे त्यांनी म्हटलं आहे. पण हे सांगतांना मुंडेंनी म्हटलं की अधिकाऱ्यांना या बाबत माहिती देण्यास मी सांगितले होते, पण त्यांनी हे काम अद्याप केलेले नाही. त्यांना वारंवार बोलवून देखील ते या संदर्भात माहिती देण्यास उपस्थित राहिले नाहीत. पंकजा मुंडे यांच्या या उत्तराने तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधीत अधिकारी प्रदुषण नियंत्रण पान २ वर

## काय म्हणाले सभापती ?

दरम्यान आपल्या या आदेशावर स्पष्टीकरण देतांना तालिका अध्यक्ष दिलीप लांडे यांनी सांगितले की, संबंधीत खात्याचे अधिकारी माहिती देत नसतील, मंत्र्यांना सहकार्य करत नसतील तर हा सभागृहातील सर्व आमदारांचा, महाराष्ट्रातील जनतेचा अपमान आहे. अधिकारी हा कितीही मोठा असला तरी त्याला त्याची जबाबदारी दाखवून देणे हे आमचे काम आहे.

## देवेंद्रसिंग हे होते बीडचे जिल्हाधिकारी



या प्रकरणात निलंबीत करण्यात आलेले प्रदुषण महामंडळाचे सदस्य सचिव आयएएस देवेंद्रसिंह यांनी काही काळ बीडचे जिल्हाधिकारी म्हणून कार्य केलेले आहे. बीडमधील त्यांची प्रशासकीय कारकीर्द ही शांततेत गेली. मात्र बढती झाल्यानंतर मुंबईत विविध खात्याच्या जबाबदाऱ्या त्यांनी बजावल्या. मंत्र्यांनी बोलुनही ते गेले नाहीत म्हणून माहिती सभागृहात मांडता आली नाही, त्यामुळे त्यांचे निलंबन करण्यात आले.

## काय आहे निलंबनाचा आदेश

महाराष्ट्र शासनाने अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६९ मधील नियम ३ च्या उपनियम (१) च्या कलम (अ) अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, सचिव एम देवेंद्रसिंग (आयएएस २०११ बॅच) यांना तात्काळ प्रभावाने निलंबीत केले आहे. या निलंबन कालावधीत त्यांचे मुख्यालय मुंबई येथे निश्चित करण्यात आले असून कोकण विभागाच्या विभागीय आयुक्तांच्या पुर्व परवानगीशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच या काळात त्यांना कोणत्याही खाजगी नोकरी, व्यापार किंवा व्यवसायात सहभागी होता येणार नाही. निलंबन काळात देवेंद्रसिंग यांना नियमानुसार निर्वाळा भत्ता, महागाई भत्ता व इतर भत्ते देय असतील. सामान्य प्रशासन विभागाने देवेंद्रसिंग यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करत त्यांना निलंबीत केले आहे. अतिरिक्त सचिव व्ही.राधा यांच्या स्वाक्षरीने हे आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत. मंत्र्यांच्या ब्रिफींगला दांडी मारणे आणि शासकीय कामात कसूर करणे ही बाब गंभीर मानत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# माझी मध्यंतरी वाचा गेली होती, जर ती तशीच गेली असती तर कदाचित अधिक चांगले झाले असते

## कारण आज दादांबद्दल असा शोक व्यक्त करण्याची वेळ माझ्यावर आली नसती -आ.धनंजय मुंडे

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी):– अजित पवार (ज्यांना सर्वजण प्रेमाने दादा म्हणत) यांच्या अचानक झालेल्या अकाली व दुःखद निधनामुळे पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. या संदर्भात बोलताना धनंजय मुंडे यांनी अत्यंत भावूक होत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ते म्हणाले की, दादांच्या अशा अनपेक्षित जाण्यानंतर आम्हा सर्व प्रमुख नेत्यांनी एकत्र बसून असा एकमुखी निर्णय घेतला की, सुनेत्राताई पवार यांच्याकडे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवावी. पुढे बोलताना ते उद्‌गारले की, ''माझी मध्यंतरीच्या काळात काही कारणास्तव वाचा गेली होती, जर ती तशीच गेली असती तर कदाचित अधिक चांगले झाले असते ; कारण आज दादांबद्दल असा शोक व्यक्त करण्याची वेळ माझ्यावर आली नसती.'' त्यांच्या या बोलण्यातून त्यांच्या मनातील तीव्र दुःख आणि वेदना स्पष्टपणे जाणवत होत्या.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची एक अतिशय महत्त्वाची बैठक नुकतीच मुंबई येथील वरळी डोमच्या भव्य हॉलमध्ये पार पडली. या बैठकीला देशभरातील आणि राज्यातील पक्षाचे अनेक वरिष्ठ व मुख्य पदाधिकारी हजर होते. प्रामुख्याने सुनेत्रा पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ आणि नरहरी झिरवाळ या सर्व बड्या नेत्यांची प्रमुख उपस्थिती या महत्त्वपूर्ण बैठकीत पाहायला मिळाली. याच बैठकी दरम्यान, राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची धुरा सांभाळणाऱ्या सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अधिकृतपणे निवड करण्यात आली. पान २ वर

## मुख्याधिकाऱ्यांनाही करुन दिली अधिकारांची जाणीव

# बीड न.प.च्या सर्वसाधारण सभेत नगरसेवक नाईकवाडेंनी स्वच्छतेच्या मुद्यावर रान उठविले

बीड दि.२७ (प्रतिनिधी):– येथील नगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये नगर सेवक अमर नाईकवाडे यांनी स्वच्छता आणि कचऱ्याच्या प्रश्नावर मुख्याधिकाऱ्यांना अनेक प्रश्न विचारले, मुख्याधिकारी साहेब आता नियमात बदल झाला आहे. पुर्वी मुख्याधिकारी अध्यक्षांच्या अधीन राहून काम करायचे, आता मुख्याधिकारी स्वत: निर्णय घेऊ शकतात. शहरातील सर्वच प्रभागामध्ये कचरा आणि स्वच्छतेचा गंभीर प्रश्न बनला आहे, तसेच माता खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात टाकलेला कचरा, कंकालेश्वर मंदिराची उशिरा केलेली स्वच्छता आणि बीड नगर पालिकेची स्वच्छता मोहिम यावर अनेक प्रश्न नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी उपस्थित केले.






नगर सेविका सारिका क्षीरसागर आणि नगर सेवक भीमराव वाघचौरे यांनीही पाणी पुरवठा, स्वच्छता व इतर प्रश्ना संदर्भात सर्वसाधारण सभेत बाजु मांडली.

सभागृहात बोलतांना अमर नाईकवाडे म्हणाले की, खंडेश्वरी माता हे बीडचे ग्रामदैवत आहे, या मंदिर परिसरातील डोंगराच्या भागातून जाणाऱ्या रस्त्यावर नगर पालिकेने कचरा आणून टाकलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात हा कचरा इथे गेल्या कित्येक दिवसापासून आणून टाकला जातो. या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांना वेळोवेळी अवगत केलेले आहे, पत्रही दिलेले आहे. काल या कचऱ्याला आग लावण्यात आली, त्यामुळे परिसरात धुराचे साम्राज्य निर्माण होऊन जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. सकाळी बीड शहरातील अनेक नागरिक या भागात मॉर्निंग वॉकसाठी येतात, नगर पालिकेचे हक्काचे डम्पींग ग्राऊंड असताना या ठिकाणी कचरा कोण आणून टाकतं, का आणून टाकतं ? त्याच बरोबर बीड शहरातील कंकालेश्वर मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान असून या मंदिराची स्वच्छता शिवरात्रीपुर्वी करणे गरजेचे होते, १२ तारखेला मी मुख्याधिकाऱ्यांना फोनही लावला होता व मंदिराची स्वच्छता करण्या संदर्भात विनंती केली होती. परंतु नगर पालिकेची स्वच्छता टीम उशिरा आली, स्वच्छता मोहिमेत दिरंगाई झाली, तसेच नगर पालिकेने सर्व प्रभागातील सामूहिक स्वच्छता मोहिम राबविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत, पान २ वर

# अंभोरा पोलीस वाहन तपासणीच्या नावाखाली करतात आर्थिक लूट

- वाहन धारकांशी हुज्जत घालत केली जाते दमदाटी
- त्या धसमुसळेपणा करणाऱ्या रझाकारी कर्मचाऱ्याची एसपींकडे तक्रार



बीड दि.२७ (प्रतिनिधी):- अंभोरा पोलिस कायम वादाच्या भोवऱ्यात असतात.एकिकडे गुन्हे दाखल होत असताना त्या गुन्हाची उकल होत नाही.तर दुसरीकडे चोरी,घरफोडीसह गंभीर गुन्हाचे प्रमाण वाढले आहे.यात लक्ष घालून निर्गती करण्यात रस वाटत नसल्याने वाहन तपासणीच्या नावाखाली वाहन धारकांशी हुज्जत घालत आर्थिक लुट केली जात असल्याचे समोर आले असुन हा कारभार धस मुसळे पणाचा सुरू आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी कायम वेगवेगळ्या चर्चेत असतात.गुन्हे उकल होत पान २ वर

## आजपासून सलग पाच दिवस बँका राहणार बंद

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी):- सलग पाच दिवस बंद राहू शकतात. होळीनिमित्ताने पुन्हा एकदा आरबीआयने सुट्ट्यांचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. शनिवार आणि रविवार शेवटचा असल्याने दोन दिवस बँक बंद राहतील. मार्च होलिका दहन असल्याने काही ठराविक राज्यात बँका बंद राहतील. पान २ वर

# पिंपळनेर ठाणे हद्दीत अफूची शेती उघड



बीड दि.२७ (प्रतिनिधी):- पिंपळनेर पोलीस ठाणे हद्दीत बेकायदा अफूची शेती केल्याचा प्रकार उघडकीस आला असून बीडच्या पोलीस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.२७ फेब्रुवारी) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास पान २ वर







विकणे आहे
अ.क्र.1948 धानोरा रोड वार्ड क्र.1 गट 2 सर्व्हे160 तरफ पिंगळे मधील प्लांट क्र.4 मालमत्ता क्र 1-2-1948 जागा 130-19 चौ.मी. सहन जागा त्वरित विकणे आहे.
::संपर्क ::
डॉ.एम.बी.जेसवाणी
9422240593



# पार्श्वभूमी



## पाटोदा पं.स.समोर केले तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी 'भिक मागो' आंदोलन

पाटोदा दि २७ (प्रतिनिधी)- पंचायत समिती पाटोदा येथील गटविकास अधिकारी यांना विविध प्रलंबित प्रश्नांबाबत विनंती अर्ज देत मंगळवारी सकाळी ११ वाजता तालुक्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी पंचायत समिती कार्यालया समोर समोर ठिय्या देत 'भिक मागो' आंदोलन केले. या आंदोलनात पाटोदा तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित प्रकरणांवर अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. विशेषतः जीपीएफ २०२४ संदर्भातील रक्कम खात्यात जमा न होणे, वेतन व इतर देयकांमध्ये होत असलेला विलंब तसेच काही कर्मचाऱ्यांचे मार्च २०२४ चे वेतन प्रलंबित असल्याच्या मुद्द्यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच २०२३ सालचे प्रलंबित वेतन व इतर आर्थिक देयके तातडीने निकाली काढावीत, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दीर्घकाळ प्रलंबित राहिलेल्या आर्थिक बाबींमुळे कर्मचाऱ्यांवर आर्थिक ताण वाढत असल्याचेही आंदोलकांनी यावेळी सांगितले. यावेळी संघटनेच्या वतीने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन प्रलंबित प्रश्न सोडवावेत, अन्यथा येत्या काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## संस्कारमध्ये क्रांतिवीर सावरकरांना विनम्र अभिवादन

बीड दि २७ (प्रतिनिधी) -येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागामध्ये क्रांतिवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त सांस्कृतिक विभागाकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या कार्यक्रमाच्या वक्त्या श्रीमती खवले व्ही .एम .यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले. स्वातंत्र्यसैनिक,समाज सुधारक,मराठी कवी व लेखक.सावरकरांची तीव्र बुद्धिमत्ता,प्रखर राष्ट्रभक्ती यावर आधारित कथा,मोर्सेलिस बेटाजवळ बोटीतून मारलेली उडी,काळ्या पाण्याची शिक्षा,अंदमानच्या तुरुंगात राहणे याविषयी माहिती दिली.जातीभेदाला विरोध,विज्ञाननिष्ठा यावर भाष्य केले. ने मजसी ने परत मातृभूमी ला, जयोस्तुते ही काव्य रचना त्यांच्या देशप्रेमाची साक्ष देतात. अशाप्रकारे त्यांच्या जीवन कार्याचा परिचय उपस्थित सर्व शिक्षकवृंदांना व विद्यार्थ्यांना करून दिला . याप्रसंगी व्यासपीठावर संस्कार विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी व विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगावकर उपस्थित होत्या .

# एस.पी.साहेब एकदा मात्र निवडायचं काम हाती घ्या कोंबिंग ऑपरेशन राबवून गुन्हेगार प्रवृत्तीला ठेचा हो



बीड दि.२७ (प्रतिनिधी):- जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी आपली यंत्रणा सुधारण्याचे काम सतत केल्याचे अनेकदा प्रकरणातून समोर आलेले आहे. परंतु गुन्हेगार प्रवृत्तीवर पाहिजे तसा धाक निर्माण झालेला नाही. शेंबड्या पोरा जवळ गावठी कट्टे दिसून येतात. चोरीचे प्रकार सतत घडत आहेत. अवैध धंदे जोमात चालत असल्याचे सुज्ञ नागरिकांचे म्हणणे येत आहे. सोन्या चांदीच्या व्यापाऱ्याला भर रस्त्यात लुटण्याचे प्रकार घडत असतील तर पोलिसांचा दरारा आहे हे कसं म्हणता येईल ? एलसीबी सोडली तर जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याचे अधिकारी पोलीस कर्मचारी गुन्हेगारावर वचक ठेवण्यासाठी कार्यतत्पर असल्याचे दिसून येत नाहीत. त्यामुळे गुन्हेगारांनी डोकं वर काढल आहे. तेव्हा एस पी साहेब एकदा मात्र निवडायचं काम हाती घ्या. कोंबिंग ऑपरेशन सतत राबवून गुन्हेगार प्रवृत्तीला ठेचा. आपोआप यंत्रणेचा वचक राहील व जनता देखील सुखा समाधानाने झोप घेऊ शकेल असे स्पष्ट मत आता नागरिकांमधून व्यक्त केले जाऊ लागले आहे.

बीडला जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पदभार घेतल्यापासून पोलीस अधीक्षक कुमावत यांचा दरारा आज देखील कायम आहे. सुरुवातीस त्यांनी यंत्रणेला सरळ करण्याचं काम केलं ज्यामुळे यंत्रणा दैनंदिन कामात ढिली पडत नाही. असं असलं तरी जिल्ह्यातील कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाहिलं तर प्रत्येक ठिकाणी गुन्हेगार प्रवृत्तीचा वरचष्मा असल्याचं विविध घटनातून समोर तर येत आहे. अशा लोकांना पोलिसांची भीती राहिली नसल्याचा जनतेतून स्पष्ट आरोप होऊ लागला आहे. आतापर्यंत अनेकदा गुन्हेगारांनी डोके वर काढले तर गंभीर गुन्हे करणारे, फरारी आरोपी, अशा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना जेरबद करण्यासाठी कोंबिंग ऑपरेशन सारख्या मोहीम राबवून पोलिसांनी दरारा निर्माण केला असल्याचे दिसून येत होते. कोंबिंग ऑपरेशन केल्यानंतर गंभीर गुन्हे करायला गुन्हेगारांचे धाडस होत नव्हते. परंतु आज घराच्या भिंती तोडून चोऱ्या होऊ लागल्या . सोन्या चांदीच्या व्यापाऱ्यांना रस्त्यावर आडवून लुटलं जाऊ लागलं . गुन्हेगार प्रवृत्तीची शेंबडी पोरं देखील कमरेला गावठी कट्टा खोचून फिरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे येत आहे. खुनाचे प्रकार सतत घडत आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मनात भीती निर्माण होत आहे. जनतेला पोलीस खातं आमचं खातं वाटाव यासाठी कडक धोरण हाती घ्या. यासाठी कोंबिंग ऑपरेशनच्या मोहिमा राबवाव्यात. जिल्ह्यातलच नव्हे तर शेजारच्या जिल्ह्यातील गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना या ऑपरेशन मधून ठेचून काढा. हे ही तितकच खरं की आपल्या पोलीस यंत्रणेला सतत कोणती ना कोणती कामे करावी लागतात. त्यामुळे गुन्हेगार डोके वर काढतात. असं असलं तरी वेळ काढून अशा मोहिमा राबवून गुन्हेगारावर कायमचा वचक निर्माण करावा अशी अपेक्षा जनतेमधून व्यक्त केली जाऊ लागली आहे.

## स्वा.सावरकरांचे विचार तरुणांनी आत्मसात करावेत भाजपा नेते -नवनाथअण्णा शिराळे

बीड दि २७( प्रतिनिधी)- स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे पुण्यतिथी जवाहर कॉलनी येथे उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी



उपस्थित असलेले बीड नपचे माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी बोलताना आजच्या तरुणांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आत्मसात करावेत असे आवाहन केले. पुढे नमूद केले की सावरकरांनी आपल्या क्रांतिकारी कार्यातून देशासमोर एक आदर्श निर्माण केला त्यांनी २८ वर्ष अंदमान निकोबार या ठिकाणी भारत देशासाठी कारागृहामध्ये काळ्या पाण्याची शिक्षा भोगली. देशासाठी केलेले त्यांचे कार्य तरुणांनी आत्मसात करावी असे आवाहन देखील यावेळी त्यांनी केले . यावेळी बी.बी. वैद्य, माजी नगरसेवक बाबुराव परळकर, प्रवीण चव्हाण, संजय देवा कुलकर्णी आदीसह मान्यवर मंडळी उपस्थित होते.

# जिल्हा उद्योग मित्र, जिल्हा निर्यात प्रचालन समितीची व जिल्हा सल्लागार समितीची संपन्न

बीड दि.२७ (प्रतिनिधी):– जिल्हाधिकारी,बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा निर्यात प्रचालन समिती व जिल्हा सल्लागार समितीची बैठक दिनांक १७.०२.२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यलय,बीड येथे संपन्न झाली.



सदर बैठकीत जिल्ह्यातील औद्योगिक विकास, निर्यातक्षम उत्पादनांना प्रोत्साहन, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांच्या समस्या तसेच त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील विविध औद्योगिक संघटनांनी महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांना भेडसावणाऱ्या अडचणी मा.जिल्हाधिकारी यांच्या समोर मांडल्या त्यावर प्रलंबित औद्योगिक प्रकरणांचा आढावा घेऊन संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना मा. जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

तसेच जिल्ह्यातील निर्यात वाढीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व विभागांमधील समन्वय वाढविण्याबाबत निर्देश देण्यात आले.

जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने अशोक शेटे यांनी व्यवसाय करा बाबत मुद्दा उपस्थित करून One Nation One Tax वर आधारित ***ऋड्ढ लागु असतानाही व्यापाऱ्यांकडून व्यवसाय कर आकारला जात असून त्याबाबत मार्ग काढून व्यापारी वर्गाला दिलासा देण्यात यावा अशी मागणी केली.

सभेस मा.श्री विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड,किरण जाधव महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,बीड,विजय काकड,व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,बीड ,श्री.राजपूत अधीक्षक अभियंता MSEB बीड,श्री.पाथरे क्षेत्र व्यवस्थापक MIDC बीड,श्री.राऊतराय उप अभियंता MIDC बीड, त्याचप्रमाणे औद्योगिक संघटनेमार्फत श्री.गोपाळ कासट, राजू संचेती,अशोक शेटे,श्री.उपरे,श्री जगताप श्री.रवी जोशी व अन्य उद्योजक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विविध सोहळ्याला नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडांची उपस्थिती

अंबाजोगाई दि.२७ (प्रतिनिधी):-केज विधानसभा मतदारसंघात आयोजित विवाह सोहळे व विविध कौटुंबिक कार्यक्रमांना अंबाजोगाई शहराचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा(काकाजी) यांनी उपस्थित राहून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच उपस्थित लोकांशी संवाद साधला.

नगराध्यक्ष मुंदडा यांनी अंबाजोगाई येथे,वैष्णव परिवारातील विवाह सोहळा या मंगलमय सोहळ्यात उपस्थित राहून नवदांपत्यास सुखी, समृद्ध व आनंदी वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. वामन परिवारातील मुंज चाकार्यक्रम उपस्थित राहून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

तसेच पुढे कुलकर्णी परिवारातील विवाह सोहळा या मंगलमय प्रसंगी उपस्थित राहून नवदांपत्यास सुखी व मंगलमय वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी उपस्थित लोकांशी संवाद देखील साधला. शिवाय लोकांच्या अडचणी देखील समजावून घेतल्या.

## मंत्री अतुल सावे यांच्या वाढदिवसा निमित्ताने जिल्हा रुग्णालयामध्ये नवजात बालकांना ड्रेस



बीड दि.२७ (प्रतिनिधी):- महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांचा अभिष्टचिंतन सोहळा गुरुवारी उत्साहामध्ये व विविध सामाजिक उपक्रमातून बीड शहरांमध्ये संपन्न झाला. महाराष्ट्र सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी जिल्हा रुग्णालय बीड या ठिकाणी २५,२६ फेब्रुवारी रोजी जन्म झालेल्या कंन्या व त्या मातांना साडी वाटपाचे ,बाळाला ड्रेसचे तसेच केळी व इतर फळांचे वाटप केले.मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी असे सामाजिक उपक्रमातून साजरा करण्यात आला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या स्वर्गवासामुळे राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळल्याने आपला वाढदिवस बॅनरबाजी किंवा इतर बाबीतून साधारण न करता सामाजिक कार्यातून साजरा करावा असे निर्देश आल्याने सावता सेनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल राऊत यांनी मंत्री अतुल सावे यांचा वाढदिवस जिल्हा रुग्णालयाचे माजी जिल्हा शल्यचिकित्सक राऊत यांच्या हस्ते व उपस्थितीत बीड जिल्हा रुग्णालयामध्ये काल व परवा जन्म झालेल्या नवजात कन्यांना व त्यांच्या मातांना वस्त्रदान करून व फळ वाटप करून साजरा केला आहे या केलेल्या उपक्रमाबद्दल त्यांचे शहरवाशियांकडून तसेच रुग्णांच्या नातेवाईकांकडून आभार व्यक्त केले जाऊ लागले आहेत.

## पुढील दोन दिवसदेशभरात असेल पाऊस

पुणे दि.२७ : गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात किमान तापमानामध्ये चढ-उतार नोंदविण्यात येत होते. त्यामुळे शहरात कधी ढगाळ वातावरण तर कधी कडक ऊन असे चित्र होते. शुक्रवारी (ता. २७) किमान आणि कमाल तापमानामध्ये वाढ झाली. परिणामी पुणेकरांना उकाड्याचा सामना करावा लागला. पुढील दोन ते तीन दिवसांत किमान तापमानामध्ये वाढ होणार असल्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविली आहे.



**बीड –शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी लिपीक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या काम बंद आंदोलनात महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनचे सचिव गिरीश बिजलवाड सह आंदोलक.**

## डॉ.विजय कट्टे यांनी स्वीकारला महाआरोग्य २०२६ पुरस्कार

बीड दि.२७ (प्रतिनिधी):–महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबईच्या वतीने राज्यस्तरीय वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान पुरस्कार सोहळयात माजलगाव ग्रामीण रुग्णालयाला , महाआरोग्य सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे आरोग्य मंत्री मा. प्रकाश आबिटकर आणि श्रीमती मेघना साकोरे आरोग्य राज्यमंत्री यांच्या हस्ते तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक तथा ऑर्थोपेडिक सर्जन डॉ.विजय मोहनराव कट्टे यांनी पुरस्कार स्वीकारला.सार्वजनिक आरोग्य सेवा जनजागृती प्रतिबंधात्मक उपाय योजना व गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा प्रदान करण्यात उल्लेखनीय व उत्कृष्ट कार्य , बेड ऑक्युपन्सी रेशो, आंतररुग्ण व बाह्यरुग्ण सेवा, मोठ्या




व लहान शस्त्रक्रिया, स्वाभाविक व सिझेरियन प्रसूती, तसेच रुग्णालयीन स्वच्छता आदी निकषांच्या आधारे राज्यस्तरीय निवड समिती द्वारे निवड करण्यात आली. या सर्व निकषांमध्ये डॉक्टर विजय कट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली दर्जेदार व लोकाभिमुख कामगिरी केल्याने ग्रामीण रुग्णालय, माजलगाव पुरस्कारास पात्र ठरले.

ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथील यशाबद्दल डॉ.विजय कट्टे यांचे डॉ. रेखा गायकवाड उपसंचालक आरोग्य सेवा लातूर, डॉ.सतीश कुमार सोळंके जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ.संजय राऊत अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक तसेच जिल्हा रुग्णालय, बीड येथील अधिकारी कर्मचारी यांनी देखील अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिलेल्या आहेत. तसेच सदरील कार्यक्रमात डॉ. दीपक राऊत ,डॉ अमोल मायकर, आशा स्वयंसेविका सुवर्णा ढोंगे यांना देखील पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## विश्व मराठी संमेलनाचे आर्ट ऑफ फन अकॅडमीला आले निमंत्रण

गेवराई दि.२७ (प्रतिनिधी):- मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन आयोजित नाशिक येथील चौथ्या विश्व मराठी संमेलनाच्या आयोजकाकडून गेवराई येथील सांस्कृतिक क्षेत्रातील अग्रगण्य संस्था आर्ट ऑफ फन अकॅडमीला लोककला सादरीकरणाचे निमंत्रण मिळाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,ज्येष्ठ कवी कुसुमाग्रजांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने मराठी भाषा विभाग व सांस्कृतिक विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने नाशिक येथे दिनांक २६ फेब्रुवारी ते १ मार्चपर्यंत के टी एच एम महाविद्यालयाच्या प्रांगणात चौथे विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यामध्ये बालरंगभूमी परिषद व महाराष्ट्र शासनाच्या वतीने गेवराई शहरातील सांकृतिक क्षेत्रात राज्यस्तरीय शेकडो पुरस्कार प्राप्त आर्ट ऑफ फन अकॅडमी तील विद्यार्थ्यांना दिनांक १ मार्च रोजी लोककलेचा जागर करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. ज्यामध्ये आर्ट ऑफ फन अकॅडमी तील विद्यार्थी मंगळागौर हा कलाप्रकार सादर करणार आहेत. यामध्ये काव्या मुंदडा, प्रांजल टाक, मन्मथ वाधवाणी , ज्ञानदा जोशी, पल्लवी उघडे, आर्या वावरे, अवनी खेत्रे, अन्वी मुंदडा, आद्या बोर्डे, अथश्री देशपांडे, हे कलाकार आपली कला सादर करणार आहेत. या कलाकारांना आर्ट ऑफ फन अकॅडमीचे संचालक रोहित पुराणिक, व शिवकुमार सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल गेवराई तथा बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ साहित्यिक तथा कलावंतांनी सर्व संघाचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.अशा भव्य दिव्य सोहळ्यात बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमीचे सर्वस्तरातून कौतुक केले जात आहे.

## महाराष्ट्रातील एका सहकारी बँकेसह एकूण पाच बँकांना आर्थिक दंड ; रिझर्व्ह बँकेचा निर्णय

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी):- आरबीआयनं महाराष्ट्रातील विटा मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, विटा या बँकेला दंड केला आहे. या बँकेला ३.१० लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे.नाममात्र सदस्यांना मर्यादेपेक्षा अधिक कर्ज दिल्याचा ठपका बँकेवर ठेवण्यात आला आहे. याशिवाय ज्या कर्जदारांना दंड लावला त्याची माहिती न दिल्याचा ठपका बँकेवर ठेवला गेला आहे.

द प्रकाशपुरम को-ऑपरेटिव्ह अर्बन को ऑपरेटिव्ह लिमिटेड, तामिळनाडू ५० हजार रुपयांचा दंड आरबीआयनं केला आहे. बँकेनं लाभांश वाटपासंदर्भात नियम न पाळल्याचा ठपका ठेवला आहे.रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं द बेळगा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, कर्नाटक या बँकेला २ लाख रुपये दंड केला.

# जनतेतून निवडून आलेल्या सरपंचाला जनतेनेच बसवले घरी

## लोणवळ बाबी सरपंचावर ६७४ विरुध्द २९८ मताने ठराव जनमतातुन मंजुर

वडवणी दि.२७ (प्रतिनिधी):- वडवणी तालुक्यातील लोणवळ बाबी येथील सरपंच मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या गावातील विविध विकास कामावर भ्रष्टाचाराचा आरोप,ग्रामपंचायत सदस्यांना विचारात न घेणे,ग्रामस्थांची आडवणूक होत आसल्याने त्यांच्या विरुध्द जनतेतुन अविश्वास ठराव घेण्यासाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन वडवणी पंचायत समीती गट विकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षते खाली गुरुवार दि २७ फेबुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ६७४ विरुद्ध २९८ आसा ठराव जनमतातुन पारीत झाल्याने जनतेने निवडून दिलेल्या सरपंचाला जनतेनेच घरी बसवल्याची तालुक्यातील काडीवडगाव पाठोपाठ ही दुसरी घटना आसल्याने तालुक्यात चर्चेचा विषय होत आहे.

. सविस्तर वृत्त आसे की तालुक्यातील लोणवळ बाबी ग्रुपग्राम पंचायत आसलेल्या सरपंच पदासाठी जनतेतून निवडून आलेल्या सरपंच सौ मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या कामामध्ये अनियमितता गावातील नागरिकांचे वेळेवर काम न करणे विकास कामाची आडवणूक करणे अदी कारणास्तव गावातील नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी सरपंच अपात्रतेसाठी १३ फेब्रुवारी २०२६ रोजी ८ विरुद्ध २ असा ठराव वडवणी पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्त करून पारीत झाला. जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्या अध्यक्षखाली शुक्रवार दि २७ फेब्रुवारी रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये एकूण ९७२ मतदारांनी सहभाग घेतला होता. यापैकी ६७४ मतदारांनी सरपंचाच्या विरोधात तर २९८ मतदारांनी सरपंचाच्या बाजूने बाजु घेतल्याने सरपंच मुक्ताबाई अंकुश राठोड यांच्या अविरोधाचा ठराव मंजूर झाला. यावेळी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, सहाय्यक गट विका, विस्तार अधिकारी अशोक निर्डे, शेख रफीक सर, दीपक जोगदंड, ग्राम पंचायत अधिकारी व्ही बी पवार सचिव गोवर्धन गिरी यांच्यासह वडवणी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक वर्षा होगाडी यांच्यासह पोलीस कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**गेल्या साडे तीन वर्षाच्या कालावधीमध्ये**



**ग्रामपंचायत मधुन होणाऱ्या कामात मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांची आडवणुक करणे, ग्रामपंचायत सदस्यांना कसल्याही प्रकारे विचारात न घेता गावात विविध विकास कामात केलेला भ्रष्टाचार यामुळे सरपंचावर अविश्वास ठराव आणला असल्याचे ग्रामपंचायत सदस्य विजय मोरे यांनी सांगितले.**

# संपादकीय

## बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे

बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. महिला व बालविकास विभागाच्या ताज्या अहवालानुसार राज्यात गेल्या सात वर्षात तब्बल ६४२८ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. म्हणजेच या हजारो चिमुरड्यांना बालवयातच बोहल्यावर चढवले जाणार होते. होऊ घातलेले हे हजारो बालविवाह रोखल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदनच करायला हवे. आकडेवारीतील ही प्रचंड वाढ प्रशासनातील सतर्कता दर्शवत असली तरी ग्रामीण भागातील बाल विवाहाची मानसिकता अद्याप बदललेली नाही हेच यातून अधोरेखित होते. मागील आठवड्यात एका पंधरा वर्षाच्या दहावीतील मुलीने तिचा होऊ घातलेला विवाह रोखण्यासाठी मुख्याध्यापकांना पत्र लिहिले होते याचाच अर्थ प्रशासनाने प्रयत्न करूनही राज्यात बालविवाह होतच आहेत. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत प्रकाशित झालेल्या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाच्या सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले होते. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले होते याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या दहा हजारांहून अधिक आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुण्या – मुंबई सारख्या मोठ्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. सरकारने मंजूर केलेल्या या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वानाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्टचालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.

# ममदापुर-पाटोदा येथे तूर हरभरा खरेदी केंद्र सुरू शेतकऱ्यांना दिलासा



अंबाजोगाई दि २७ (प्रतिनिधी)- तालुक्यातील नांदडी येथील कृषी चंद्रमा अग्रो प्रोडूसर कंपनीच्या माध्यमातून हरभरा तूर खरेदी केंद्र सुरू झाले आहे . यामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे.

कडधान्य आत्मनिर्भरता अभियान अंतर्गत नाफेड मार्फत मॉडेल खरेदी केंद्र म्हणून कृषीचंद्रमा ग्रो प्रोडूसर कंपनी लिमिटेड ममदापूर पा. ता. अंबाजोगाई जि.बीड ला नाफेड मार्फत थेट मंजुरी मिळाली आहे. परिसरातील शेतकऱ्याच्या हरभरा मालासाठी हमीभाव नोंदणी सुरू झाली आहे. तुरीची नोंदणी आणि खरेदी सुरू आहे. तूर आणि हरभरा खरेदी केंद्र सुरू झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. धानोरा खुर्द परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी चंद्रमा प्रोडूसर कंपनी कडे नोंदणी करावी असे आव्हान संचालक सचिन मामडगे यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या हरभरा शेतीमाल हमीभाव ५,८७५ क्विंटलने खरेदी करण्यात येणार आहे तर तुर हमीभाव ८,००० रू. क्विंटलने खरेदी होणार आहे. शेतकऱ्यांना आधार बेसवर माल खरेदी केल्यापासून ४८ तासात शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा होणार आहेत. तूर खरेदी केंद्र आणि हरभरा नोंदणी सुरू झाली आहे.खरेदी केंद्र सुरू झाल्याने झाल्याने धानोरा खुर्द परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

कृषी चंद्रमा ऍग्रो प्रोडूसर कंपनी नांदडी येथे तुरीची हमीभावाने खरेदी सुरू झाली हरभरा खरेदीसाठी नोंदणी सुरू झाली आहे. हरभरा आणि तूर विक्रीसाठी शेतकऱ्यांना ३१ मार्चपर्यंत हरभरा तर २४ मार्च पर्यंत तूर नोंदणी करता येणार आहे. तरी शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करावी. शेतकऱ्यांना तूर हरभरा खरेदी केल्यापासून अवघ्या ४८ तासात खात्यावर होणार आहेत. तरी अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करून तूर हरभरा कृषी चंद्रमा ग्रुप सर कंपनी यांच्याकडे शासनाच्या हमीभावाने विक्री करावा असे आव्हान कृषी चंद्रमा अग्रो प्रोडूसर कंपनीच्या माध्यमातून संचालक सचिन मामडगे यांनी केले आहे.

# एस.एम.देशमुख यांच्या हस्ते ४४ व्या राष्ट्रीय अधिवेशन संपर्क कार्यालयाचे उद्घाटन



अंबाजोगाई दि २७ (प्रतिनिधी)- उदगीर मध्ये एप्रिल या महिन्यात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन होत असून या ठिकाणी एक संपर्क कार्यालय उभारण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याबाबत अधिक वृत्त असे की लातूर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी एप्रिलच्या तिस-या आठवड्यात अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचं ४४ वं राष्ट्रीय अधिवेशन होत आहे. अधिवेशनाला २५०० पत्रकार उपस्थित राहतील.त्यादृष्टीनं नियोजन करण्यात येत आहे. या तयारीची पाहणी करण्यासाठी नुकतेच मराठी पत्रकार परिषदेचेमुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर हे उदगीर मध्ये होते. तयारीच्या दृष्टीनं त्यांनी या ठिकाणी असलेल्या अनेक मान्यवरांच्या भेटी घेतल्या. त्याच बरोबर शहरात नव्याने ४४ व्या अधिवेशनाच्या संपर्क कार्यालयाचं उद्घाटन श्री.एस.एम.देशमुख* यांनी केले.यावेळी बोलताना त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक चळवळीचं केंद्र असलेल्या उदगीर शहरात परिषदेचं हे अधिवेशन नक्की यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला.यावेळी शरद पाबळे, मिलिंद अष्टीवकर, सचिन शिवशेट्टे यांची भाषणं झाली. यावेळी उदगीर मधील स्थानिक पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# पर्यावरण संरक्षण ही काळाची मुख्य गरज ; वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांचे प्रतिपादन



अंबाजोगाई दि २७ (प्रतिनिधी) – डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर, विद्यार्थी विकास विभाग व मानवलोक समाजकार्य महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवशीय पर्यावरण संरक्षण व कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेचे उद्घाटक वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांच्या हस्ते व श समीर पठाण अंबाजोगाई, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव, डॉ. नजीर शेख, डॉ. किसान शिनगारे व या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. हनुमंत साळुंके यांच्या उपस्थितीत झाड लावून पार पडले. यावेळी त्यांनी पर्यावरण संरक्षण ही काळाची मुख्य गरज असल्याचे प्रतिपादन केले. समीर पठाण यांनी आपल्या मार्गदर्शनात पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन यासाठी येणाऱ्या काळात शासनाने घनदाट जंगल ही संकल्पना प्रभावीपणे राबवावी, वाढते शहरीकरण, जंगलतोड आणि हवामान बदल यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे असे म्हटले.अध्यक्षीय समारोपात डॉ प्रकाश जाधव यांनी हवामान बदल, वायू व जलप्रदूषण, प्लास्टिक कचरा आणि वनतोड यांसारख्या समस्यांमुळे समाजासमोर निर्माण झालेल्या संकटांचा आढावा घेतला.पर्यावरण संरक्षण व प्रशिक्षण या कार्यशाळेच्या प्रस्ताविक भाषणात डॉ. हनुमंत साळुंके यांनी पर्यावरणाचे वाढते महत्त्व आणि सध्याच्या काळातील त्यासमोरील आव्हाने यावर सविस्तर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान सोन्नर यांनी केले तर उपस्थित मान्यवरांचे आभार आशिष सिरसाट यांनी मांनले.

# छावा सेनेचा स्तुत्य उपक्रम

## शिवजयंतीनिमित्त दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन व ब्लँकेटचे वाटप



गेवराई दि.२७ (प्रतिनिधी) :- हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गेवराई शहरातील मतिमंद निवासी विद्यालयात छावा क्रांतीवीर सेनेच्या वतीने अनावश्यक खर्चाला फाटा देत दिव्यांग विद्यार्थ्यांना मिष्ठान्न भोजन तसेच ब्लँकेटचे वाटप व मोफत आरोग्य तपासणी करुन सामाजिक उपक्रमाने जयंती साजरी करण्यात आली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल छावा क्रांतीवीर सेनेचे उपस्थित मान्यवरांसह इतरांनी कौतुक केले आहे. प्रत्येक महापुरुषांची जयंती अशा पद्धतीने सामाजिक उपक्रमाने साजरी केली पाहिजे असे आवाहनही यावेळी करण्यात आले. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप, छावाचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, सपोनि संतोष जंजाळ, पोलिस उपनिरीक्षक बोडखे, छावा सेनेचे भगवान सोरमारे, ज्ञानेश्वर तांगडे, किराणा असोसिएशन चे बाळूशेठ बरगे, ग्रामसेवक अनिल आटोळे, पत्रकार विनायक उबाळे, डॉ.लेंडगुळे, शिवाजी ढोबळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक छावा क्रांतीवीर सेनेचे जिल्हाप्रमुख राहुल चाळक तर सुत्रसंचालन पत्रकार विनोद पौळ यांनी केले. यावेळी तलाठी किरण दांडगे, तलाठी ढाकणे , मुक्ताराम मोटे, नारायण चाळक, ओमकार मोटे, महेश मोटे, अप्पा मोटे, आदित्य मोटे आप्पासाहेब मोटे, अशोक मोटे, ओमकार काळे, कैलास मार्गे, राम मोटे, गौरव चौधरी, विकास धस, अभिषेक चाळक, दीपक मोटे, बंटी यादव, अविनाश थोरात आकाश शिंदे तसेच शिवप्रेमी नागरिक व शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तृतीय पंथीयांच्या टाळीमागील वेदना आणि सामाजिक स्विकाराचा प्रश्न ऐरणीवर



गेवराई दि.२७ (बापू गाडेकर) :- गेवराई शहरातील चौक, बसस्थानक, रेल्वे स्थानक तसेच सण-उत्सव व शुभकार्यांच्या ठिकाणी तृतीय पंथीयांच्या उपस्थितीमुळे पुन्हा एकदा त्यांच्या सामाजिक स्थितीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. टाळ्या वाजवत लोकांकडून पैसे मागणाऱ्या या व्यक्तींविषयी अनेकदा गैरसमज पसरलेले असले तरी त्यांच्या मागे दडलेला संघर्ष आणि वेदना याकडे समाजाचे दुर्लक्ष होत असल्याची खंत व्यक्त होत आहे. समाजसेविका तथा तृतीय पंथीय सई नगरकर यांनी या संदर्भात बोलताना सांगितले की तृतीय पंथीयांना दयेची गरज नाही. आम्हाला हवी आहे सन्मानाची वागणूक आणि समान संधी. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक स्वीकार मिळाला तर आम्हीही मुख्य प्रवाहात सक्षमपणे उभे राहू शकतो. तृतीय पंथीयांना जन्मापासूनच कुटुंबीय आणि समाजाकडून उपेक्षा सहन करावी लागते. लैंगिक ओळख स्पष्ट झाल्यानंतर अनेकांना घराबाहेर काढले जाते किंवा मानसिक छळाला सामोरे जावे लागते. शिक्षणाच्या काळात होणारी चेष्टा, अपमान आणि भेदभाव यामुळे अनेकांचे शिक्षण अर्धवट राहते. परिणामी नोकरीच्या संधी मर्यादित होतात. रोजगाराच्या क्षेत्रातही तृतीय पंथीयांना भेदभावाचा सामना करावा लागतो. पात्रता असूनही केवळ ओळखीमुळे नकार दिला जातो असा आरोप काही जणांनी केला आहे. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी पारंपरिक पद्धती, आशिर्वाद देणे किंवा इतर असंघटित व्यवसायांचा आधार घ्यावा लागतो. सई नगरकर या सोशल मीडियावरही सक्रिय असून इन्स्टाग्राम व फेसबुकवर त्यांचे मोठ्या प्रमाणात फॉलोअर्स आहेत. त्या आपल्या खात्यांवरून प्रेरणादायी व्हिडिओ, सामाजिक संदेश आणि तृतीय पंथीयांच्या हक्कांविषयी जनजागृती करणारी पोस्ट शेअर करत असतात. त्यांच्या या उपक्रमामुळे समाजातील अनेक तृतीय पंथीयांचा आत्मविश्वास बळावत असून त्यांना सामाजिक मान्यता मिळण्यास मदत होत असल्याचे सांगितले जात आहे. कायद्याने तृतीय पंथीयांना स्वतंत्र ओळख व विविध हक्क देण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. सरकारी योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत असल्याची तक्रार संबंधितांनी केली आहे. सई नगरकर यांनी शासन व समाजाने संवेदनशीलतेने पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे. आमची टाळी हि केवळ उदरनिर्वाहासाठी नसून आमच्या अस्तित्वाचा आवाज आहे असे त्यांनी नमूद केले. तज्ज्ञांच्या मते, शालेय स्तरापासून समानतेचे शिक्षण आणि रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास तृतीय पंथीयांचा सामाजिक समावेश अधिक प्रभावीपणे होऊ शकतो. त्यामुळे समाजाने सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आवश्यक आहे असे ही नगरकर यांनी सांगितले.

# जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे मराठी भाषा गौरव दिन




माजलगाव(प्रतिनिधी):जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे तालुका विधी सेवा समितीच्या वतीने कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश आर.पी.परदेशी होत्या.तर प्रमुख व्याख्याते म्हणून बाळासाहेब सोनसळे हे उपस्थित होते.विचारपीठावर वरिष्ठस्तर न्यायाधीश एस.एस.बुद्रूक, डी.एन.चामले, न्यायाधीश आर.बी.पौळ, जी.एस.खूपसे यांची देखील उपस्थिती होती.मराठी भाषा गौरव दिनाविषयी बोलताना व्याख्याते बाळासाहेब सोनसळे म्हणाले की,ज्ञानपीठ पुरस्कार विजेते,मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार,कथाकार व समीक्षक वि. वा शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे.मराठी मध्ये विपुल साहित्य निर्माण झालेले आहे. त्याचप्रमाणे अतिशय प्राचीन भाषा म्हणून मराठी भाषेची जपवणूक करणे हे आपले कर्तव्य आहे.याप्रसंगी न्यायालयातील कामकाज देखील संपूर्णपणे मराठीत व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याचप्रमाणे सर्वांनी मराठीतील उत्कृष्ट साहित्याचे वाचन करावे असे आवाहन त्यांनी केले. वरिष्ठस्तर न्यायाधीश डी.एन.चामले यांनी देखील आपले विचार याप्रसंगी मांडले. शेवटी अध्यक्ष समारोप करताना जिल्हा न्यायाधीश आर.पी परदेशी यांनी कुसुमाग्रज यांची कणा ही कविता सादर केली व सर्वांना मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगितले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक गरुड बी.ए यांनी केले तर आभार ॲड.दत्ता जाधव यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल सोनसळे, ऋषिकेश जाधवर,कवडे, जोशी, वाघमारे व न्यायालयातील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आदित्य शिक्षण संस्थेत मराठी भाषा गौरव दिन साजरा

## इंग्रजी शिका,पण मराठी विसरू नका-प्रा.विकास ढोकणे




बीड दि २७ (प्रतिनिधी)- भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची ओळख, इतिहासाची साक्ष, संस्कारांची परंपरा आहे. आपण इंग्रजी, हिंदी किंवा इतर भाषा नक्की शिकलो पाहिजे. मात्र आपल्या मराठी भाषेचा सन्मान आणि वापर कधीही कमी होता कामा नये. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा आणि संत गाडगेबाबा यांनी मराठी भाषेतून समाजप्रबोधन केले. ही परंपरा जपणे हीच खरी मराठीची सेवा आहे, असे प्रतिपादन शासकीय तंत्रनिकेतन, जळगाव येथील अधिव्याख्याता प्रा. विकास ढोकणे यांनी केले. आदित्य शिक्षण संस्था, बीड येथे आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी मराठी भाषेप्रती आपला अभिमान व्यक्त केला. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त पुढे बोलताना प्रा. विकास ढोकणे यांनी मराठी भाषेचा इतिहास, परंपरा, वैभव अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. राहुल खडके होते. प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआय महाविद्यालयाचे प्राचार्य वाघ उपस्थित होते.प्रस्तावना प्रा.अजय दुधाळ यांनी केली. आभार प्रा. दुधाळ यांनी मानले.

# संत भगवान बाबांनी अध्यात्मिक भक्तीचा मळा फुलविला-महंत हभप हनुमंत शास्त्री



बीड दि.२७ (प्रतिनिधी)-संत भगवानबाबांनी वारकरी संप्रदायाला रंग रूप देण्याचे काम केले. आध्यात्मिक पेरणी करून वारकरी संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला. संत भगवान बाबा यांनी अध्यात्मिक भक्तीचा मळा फुलविला यामुळे अध्यात्मिक क्षेत्रातील कार्याबरोबरच त्यांचे सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे. लाखो लोकांना सन्मार्गाचा मार्ग दाखविण्याचे कार्य संत श्रेष्ठ भगवान बाबा यांनी केले.बीड येथे संत भगवान बाबा प्रतिष्ठान' वर आयोजित अखंड हरीनाम सप्ताहात ह.भ.प.हनुमंत महाराज शास्त्री, मठाधिपती, सालसिद्ध बाबा संस्थान, मिडसांगवी यांनी अभ्यासपूर्ण निरुपण करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी बोलतांना ह.भ.प. हनुमंत महाराज शास्त्री यांनी संतश्रेष्ठ भगवान बाबाच्या कार्याविषयी आपल्या कीर्तनातून अभ्यासपूर्ण निरूपण केले. विविध दृष्टांत देऊन त्यांनी संतश्रेष्ठ वै. भगवानबाबांच्या कार्याची महती सांगितली.भगवान बाबांचे ऐश्वर्यसंपन्न संपन्न व्यक्तिमत्व, पोशाख, याविषयी वैशिष्ट्यपूर्ण शब्दात केलेल्या वर्णनामुळे भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले. आपल्या कीर्तनात त्यांनी प्रारंभी संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या कार्याचा परिहार देऊन डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्या भगवानगडावर सुरू असलेल्या संत संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर आणि शास्त्री बाबांच्या कार्याची माहिती दिली.यावेळी मृदंगाचार्य ज्ञानेश्वर माऊली तांदळे, गायनाचार्य ह.भ.प. बंडू महाराज जटाळ, अंगद महाराज सोनवणे, अंगद महाराज मोरे, प्राचार्य त्रंबक महाराज मातकर, नामदेव मुंडे, किसन महाराज माने, मनोज बोठे, श्रीराम महाराज सानप, शेळके महाराज, आश्रुबा सानप, विणेकरी वाल्मीक महाराज चाटे यांनी साथसंगत केली.कीर्तनाचा कार्यक्रम विविध क्षेत्रातील मान्यवर भाविक भक्त, टाळकरी, सप्ताह समितीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# देशमाने जे.सी.सर यांचे निधन



माजलगाव (प्रतिनिधी):- येथील जि.प.माध्यमिक शाळा (मुलांची)यांच्या मार्गदर्शना खाली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शक लाभलेले शिकलो असे आदर्श शिक्षक,सामाजिक,धार्मिक क्षेत्रातील सर्वपरिचित व्यक्तीमत्व म्हणजे जालिंदर चंद्रभान देशमानेसर यांचं दि.२६ फेब्रुवारी गुरुवार रोजी सायंकाळी ५वा.चे सुमारास खाजगी दवाखान्यात दुःखद निधन झाले.त्यांचा अंतिम संस्कार येथील मंगलनाथ स्मशानभूमी मध्ये रात्री १०वा.करण्यात आला.त्यांचे पश्यात पत्नी,तीन मुली-जावई,दोन मुलं -सुना नातवंड व भाऊ-बहीणी असा मोठा परिवार आहे.

# बार्शी रोडवर अनधिकृत शेड,गाळ्यांचा व बांधकामाचा सुळसुळाट

बीड दि २७ (प्रतिनिधी) - शहरातील नगर रोड, बार्शी रोड व जालना रोड परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अनधिकृत पत्र्याच्या शेड व गाळे उभारण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. या प्रकाराकडे बीड नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू असून त्यामुळे नगरपालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे.

बार्शी रोड परिसरात उभारण्यात आलेल्या काही पत्र्याच्या शेड व गाळे कोणतीही अधिकृत परवानगी न घेता बांधण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. संबंधित मालकांकडून लाखो रुपये डिपॉझिट स्वरूपात घेऊन दरमहा दहा ते पंधरा हजार रुपये भाड्याने गाळे दिले जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र या गाळ्यांची अधिकृत नोंद नगरपालिकेकडे नसल्याचेही समजते यामुळे नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन अनधिकृत पत्र्याचे शेड गाळे यावर कारवाई करावी तसेच शेड, गाळे हे कोणत्याच नियमात नसून समोर पार्किंगसाठी जागा सोडली नसल्याचे दिसत आहे. यामुळे या रस्त्यावरून ये जा करणाऱ्या नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे.नोंदणी व परवानगीशिवाय सुरू असलेल्या या व्यावसायिक व्यवहारांमुळे नगरपालिकेला मिळणारा कर, परवाना शुल्क व इतर महसूल थेट पाण्यात जात असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## नगरपालिकेचा लाखोचा महसूल पाण्यात ;नियमाची पायमल्ली



आहे. त्यामुळे शहरातील सर्व अनधिकृत गाळे व पत्र्याच्या शेडची सखोल तपासणी करून नियमभंग आढळल्यास दंडात्मक कारवाई करावी, तसेच आवश्यक तेथे शेड हटविण्याची कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.तसेच शहरात अनाधिकृत हॉटेल्स,लॉज व दवाखाने बांधकामाचे प्रमाण देखील वाढले आहे ते नियमात बांधली आहेत का पार्किंग सुविधा देण्यात आली हे देखील नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांनी लक्ष घालून अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे जरूरीचे आहे.

## CCFS-२०२६ : कंपनी परताव्यामध्ये (प्रोड्युसर कंपनी, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी)

# खर्च आणि दंड वाचवणारा महत्त्वाचा बदल

कॉर्पोरेट क्षेत्रात कार्यरत प्रत्येक कंपनीसाठी नियमांचे पालन (Compliance) ही सतत चालणारी आणि अत्यावश्यक प्रक्रिया आहे. उशीर, माहितीतील त्रुटी किंवा अज्ञानामुळे कंपन्यांना मोठ्या दंडाला, नोटिसांना आणि अनावश्यक आर्थिक भाराला सामोरे जावे लागते.याच पार्श्वभूमीवर Ministry of Corporate-ffairs यांनी २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर केलेली CCFS -२०२६ (Company Compliance Fresh Start Scheme -२०२६) ही योजना कंपन्यांसाठी दिलासादायक ठरणारी आहे.

**कंपनी कायद्याकडे दुर्लक्ष - गंभीर परिणाम**

अनेक उद्योजक कंपनी स्थापन केल्यानंतर आपला भर प्रामुख्याने Income Tax आणि GST अनुपालनावर ठेवतात. मात्र Companies Act २०१३ हा पूर्णपणे स्वतंत्र, तांत्रिक आणि कठोर कायदा आहे.या कायद्याअंतर्गत वार्षिक रिटर्न, आर्थिक विवरणपत्रे (Fianancial Statements), संचालकांचे तपशील, वैधानिक नोंदी इत्यादी वेळेत दाखल न केल्यास गंभीर आर्थिक व कायदेशीर परिणाम भोगावे लागू शकतात. प्रत्यक्षात अनेक कंपन्या नोंदणीनंतर वर्षानुवर्षे ROC रिटर्न्स दाखल करत नाहीत. ही चूक बहुतेक वेळा अज्ञानामुळे घडते; परंतु कायद्याच्या दृष्टीने अज्ञान हा बचाव ग्राह्य धरला जात नाही.

**CCFS -२०२६ : उद्योजकांसाठी दुसरी संधी**

ही योजना म्हणजे भूतकाळातील अनुपालनातील त्रुटी सुधारण्याची सुवर्णसंधी आहे. योजनेअंतर्गत ठरावीक कालावधीत कंपन्यांना मागील वर्षांतील प्रलंबित ROC फॉर्म्स आणि रिटर्न्स अतिरिक्त कडक कारवाईशिवाय दाखल करण्याची संधी दिली जाते. योग्य पद्धतीने फायलिंग केल्यास मोठ्या दंडातून दिलासा मिळू शकतो.ही योजना विशेषतः खालील कंपन्यांसाठी उपयुक्त आहे:

Producer Company, Private Limited Company, Small Company, OPC दीर्घकाळ अनुपालन प्रलंबित असलेल्या कंपन्या उद्योजकांना नेमका काय फायदा ?

**१. मोठ्या दंडातून दिलासा**

सामान्य परिस्थितीत विलंबासाठी दररोज अतिरिक्त शुल्क आकारले जाते आणि तो दंड अनेकदा लाखोंपर्यंत पोहोचतो. या योजनेअंतर्गत हा आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो.

**२.कंपनी Active स्थितीत येते**

प्रलंबित अनुपालन पूर्ण केल्याने कंपनीची कायदेशीर स्थिती सुधारते. बँक कर्ज, गुंतवणूक, टेंडर प्रक्रिया आणि इतर व्यावसायिक व्यवहारांसाठी हे अत्यंत आवश्यक आहे.

**३. संचालकांची अपात्रता टाळता येते**

कंपनी कायद्याचे पालन न केल्यास संचालक अपात्र (Disqualified) होण्याचा धोका असतो. CCFS-२०२६ मुळे हा धोका टाळण्याची संधी मिळू शकते.

**४.व्यवसाय बंद किंवा हस्तांतरण सुलभ होते**

अनुपालन पूर्ण नसल्यास कंपनी Strike Off करणे किंवा शेअर्स हस्तांतरित करणे कठीण होते. योजना वापरून हा अडथळा दूर करता येतो.

**रिटर्न कसे भरावेत ? (उद्योजकांसाठी सोपी दिशा)**

कंपनीची प्रलंबित वर्षे व न भरलेले ROC फॉर्म्स ओळखावेत आर्थिक विवरणपत्रे व आवश्यक कागदपत्रे तयार करावीत अनुभवी CA/CS यांचे मार्गदर्शन घ्यावे. योजना कालावधी संपण्यापूर्वी सर्व फायलिंग पूर्ण करावी.

**योग्य व्यावसायिक सल्ल्याचे महत्त्व**

कंपनी कायद्यांतर्गत अनुपालन हे अत्यंत तांत्रिक व विशेषीकृत क्षेत्र आहे. कॉर्पोरेट गव्हर्नन्स, ROC फायलिंग, वार्षिक रिटर्न्स, संचालकांची जबाबदारी आणि वैधानिक नोंदी या बाबी कायदेशीरदृष्ट्या संवेदनशील आहेत.कंपनी सेक्रेटरी (CS) यांना कायद्याने कंपनी कायदा व ठजउ अनुपालन विषयातील तज्ज्ञ म्हणून मान्यता दिली आहे. योग्य वेळी योग्य तज्ज्ञ सल्ला न घेतल्यास कंपन्या नकळत मोठ्या अडचणीत सापडू शकतात.

**निष्कर्ष**

फक्त Income Tax आणि GST पालन म्हणजे पूर्ण अनुपालन नाही. कंपनी कायद्याकडे दुर्लक्ष केल्यास व्यवसायाच्या भविष्यास गंभीर धोका निर्माण होतो. २४ फेब्रुवारी २०२५ रोजी जाहीर झालेली CCFS-२०२६ योजना ही भूतकाळातील चुका सुधारण्याची आणि भविष्यातील दंडात्मक कारवाई टाळण्याची महत्त्वाची संधी आहे.उद्योजकांनी या योजना कालावधीचा योग्य वापर करून आपली कंपनी कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित करावी-कारण वेळ निघून गेल्यानंतर पर्याय अत्यंत खर्चिक आणि गुंतागुंतीचे ठरू शकतात.

**- लेखक : पवन कासट**
Practicing Company Secretary
मो.९४२२९२७९५७

## भक्ती कन्स्ट्रक्शनकडे जाणाऱ्या रस्त्यावर

# अस्ताव्यस्त पार्किंगमुळे नागरिक त्रस्त



बीड दि २७ (प्रतिनिधी) : बीड शहरातील नगर रोड लगत असलेल्या भक्ती कन्स्ट्रक्शन परिसरात रहदारीत वाढ होत असून रस्त्यावर होत असलेल्या अस्ताव्यस्त पार्किंगमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वळण रस्त्यावरच वाहने उभी केली जात असल्याने समोरून येणारे वाहन दिसत नाही आणि त्यामुळे लहान-मोठ्या अपघातांचा धोका वाढला आहे.

भक्ती कन्स्ट्रक्शन परिसर गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात विकसित झाला असून येथे वाहतुकीची वर्दळ वाढली आहे. मात्र नियोजनाअभावी वाहनधारक रस्त्याच्या कडेला तसेच वळणावरच गाड्या उभ्या करत असल्याने वाहतूक कोंडी आणि अपघाताची शक्यता निर्माण होत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या कारणामुळे अनेक किरकोळ अपघात घडले आहेत.या मार्गावरून विश्वेश्वर कॉलनी, आयटीआय कॉलनी व त्र्यंबकेश्वर कॉलनीतील सुमारे पाचशेहून अधिक कुटुंबांचा दैनंदिन प्रवास होतो. तसेच परिसरात कोचिंग क्लासेस, शाळा व महाविद्यालये असल्याने विद्यार्थिनींना विशेषतः अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील गजानन महाराज मंदिर येथे कायम भाविकांची गर्दी असते. त्यामुळे वाहतुकीचा ताण आणखी वाढतो. अशा परिस्थितीत वळण रस्त्यावर पार्किंगला तात्काळ बंदी घालून वाहतूक पोलिसांनी नियमित कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.तसेच या भागात रात्री अपरात्री बुलेट स्वार फटाक्याचे आवाज काढून वाहन अति वेगाने चालवत असल्याने नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे यामुळे पोलीस प्रशासन अनेक देखील याची दखल घेऊन अशा दुचाकी स्वारावर कारवाई करावी.नागरिकांना होणाऱ्या तक्रारीची दखल घेऊन 'नो पार्किंग' फलक लावावेत, वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी नियुक्त करावेत आणि नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांतून होत भूमिका आहे.

## स्वामिनी देशमुख हिची नृत्य स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी



चौसाळा (प्रतिनिधी): चौसाळा येथील सालाबादप्रमाणे यावर्षी भवानी ग्रुप सार्वजनिक शिवजयंती महोत्सव चौसाळा दिनांक २५ फेब्रुवारी रोजी भव्य खुल्या राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. त्यात बाल समुह गटातील कुमारी स्वामिनी अक्षय देशमुख या बाल कलाकार हिने नऊवारी साडी या गीतावर सुंदर असे नृत्य कला सादर केले. यावेळी शिवजयंती अध्यक्ष सचिन भैया सोनवणे , उपाध्यक्ष कोडिराम भैया जोगदंड, सचिव कैलास भैया तोडकर, सहसचिव मजिद मुराने व भवानी ग्रुप संस्थापक सुधाकर काका गुंजाळ ,देशमुख व यावेळी छायाचित्र अमोल शेटे यांनी घेतले.

## राष्ट्रीय रोल बॉल स्पर्धेमध्ये चैम्पियन स्केटिंग अकॅडमीच्या खेळाडूंचे यश

बीड (प्रतिनिधी):दि.२१ ते २३ फेबूरवारी २०२६ रोजी १५ वी मिनी नॅशनल रोल बॉल स्पर्धा (११ वर्ष आतिल मूले/मुली) तिरूची, तामिळ नाडू येथे पार पडल्या या स्पर्धेत बीड जिल्हा संघातून महाराष्ट्र राज्य मुलीच्या संघामध्ये स्वरा सानप, आराध्या नेहरकर व मुलाच्या संघामध्ये चौरे यांची निवड झाली होती. या स्पर्धेत मधे मुलींच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले या खेळाडूंना व्यवस्थापक धीरज सिरसाट, प्रशिक्ष विशाल गिरी , वैभव गिरी यांचे मार्गदर्शन मिळाले.

# भाषा टिकण्यासाठी प्रवाही राहावी-ओमप्रकाश दायमा

## मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न

माजलगाव (प्रतिनिधी) : भाषेला समृद्ध करण्यासाठी शासन स्तरावर अनेकविध प्रयत्न केले जात असून खऱ्या अर्थाने भाषा टिकवण्यासाठी ती प्रवाही असावी तरच भाषेचे भविष्य उज्वल राहील असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी भाषा शिक्षक ओमप्रकाश दायमा यांनी केले.



महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्र.मुख्याध्यापक सुधीर देशमुख तर व्यासपीठावर मुख्याध्यापिका ज्योत्स्ना कुलकर्णी,संस्था सदस्य हिमांशू देशमुख, ज्येष्ठ शिक्षक सुमंत गायकवाड,संयोजिका अर्चना भाले यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना श्री.दायमा म्हणाले की,मराठी भाषेचे खरे उगमस्थान मराठवाड्याच्या भूमीत असून तिला समृद्ध करण्यात मागील २५०० वर्षात अनेक संत-साहित्यिकां पासून ते शालेय विद्यार्थ्यां पर्यंत सर्वांचा मोलाचा वाटा आहे.अध्यक्षीय भाषणात प्र.मुख्याध्यापक देशमुख म्हणाले की,मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता सर्व मराठी जनांची जबाबदारी वाढली असून माय मराठीचे वैभव टिकवण्यासाठी केवळ एक दिवस भाषेचा गौरव न करता दररोज भाषेच्या समृद्धीसाठी आपण प्रयत्नशील राहावे. याप्रसंगी कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांनी अभिवादन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिका, चिकटबुक,वार्षिक अहवालाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. मुलांनी गीते,कथा,विनोद सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन आभार विद्यार्थी संसदेच्या पदाधिकारी यांनी मानले.कार्यक्रमासाठी सर्व सहकारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आ.धस यांचा पाटोद्यातील सभापती निवडीत निवडणूक पूर्व मास्टर स्ट्रोक

## सामाजिक समतोल साधत उमर चाऊस यांना बांधकाम सभापतीपद



**पाटोदा/महेश बेदरे**

पाटोदा नगरपंचायतीतील सभापती पदाच्या निवडीत आमदार सुरेश आण्णा धस यांनी पुन्हा एकदा आपली मुद्देगिरी आणि राजकीय रणनीती सिद्ध केली. सर्वांच्या अंदाजांना छेद देत प्रभाग क्रमांक १० चे नगरसेवक उमर चाऊस यांना सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदाची संधी देण्यात आली; तर इतर सर्व समित्यांत कोणताही खांदेपालट न करता स्थैर्य कायम ठेवण्यात आले.

शुक्रवारी नगरपंचायत कार्यालयात पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत पिठासीन अधिकारी प्रबोधय मुळे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया झाली. अर्थसंकल्पीय अधिवेशनानिमित्त मुंबईत असतानाही आमदार धस यांच्या स्पष्ट सूचनेनुसार केवळ एकाच खात्यात बदल करण्यात आला आणि उमर चाऊस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

**'एक बदल, अनेक संदेश'**

नगरपंचायतीचा पाच वर्षांचा कार्यकाल येत्या नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पूर्ण होत असल्याने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सामाजिक व राजकीय समीकरणे साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून आला. मागील काही दिवसांपासून शहरात 'भाकरी फिरणार का ?' यावर चर्चा रंगली होती; मात्र धस यांनी केवळ एकाच पदावर बदल करून आपल्या अचूक डावपेचांची झलक दाखवली.त्यामुळे चाऊस परिवाराला नगरपंचायतीच्या सत्तासमीकरणात स्थान देत सामाजिक प्रतिनिधित्वाचा समतोल साधण्याचा प्रयत्न झाल्याची राजकीय चर्चा सुरू आहे.

**इतर समित्यांत स्थैर्य**

किशोर आढागळे - शिक्षण व आरोग्य समिती सभापती (कायम), अश्विनी हनुमंत काळे - नियोजन, विकास व अर्थ समिती (कायम), आरती रामेश्वर गोरे - महिला व बालकल्याण समिती सभापती (कायम), रोहिदास गीते (उपनगराध्यक्ष) - पाणीपुरवठा सभापती (कायम)

या निर्णयामुळे काही इच्छुकांचा हिरमोड झाल्याचे दिसून आले, मात्र नगरपंचायतीत स्थिरता राखण्याचा संदेशही देण्यात आला.निवडीनंतर पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा दिपाली जाधव, मुख्याधिकारी अभय कुमार जोशी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला, उपनगराध्यक्ष रोहिदास गीते, गटनेते बळीराम पोटे, सोमीनाथ कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष नय्युम पठाण, रिपाई चे डॉक्टर नरेंद्र जावळे माजी सभापती राजू जाधव, शरद बामदळे नगरसेवक असिफ सौदागर, रूपाली जावळे, संजय शिंदे, राजश्री जाधव, संतोष जाधव, अनिता गीते, श्रीहरी गीते, महादेव जाधव सुनील वाघमारे सय्यद शहाबाज यांच्यासह कार्यालयीन अधीक्षक प्रेमकुमार मस्के कर्मचारी राहुल टाळके अक्षय कदम विठ्ठल रूपनर श्रीनिवास राऊत काका जाधव महेश भाकरे सुनील शिंदे अरविंद सरवदे सर्व नगरसेवक, पदाधिकारी, नगरपंचायत अधिकारी-कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**निवडणूकपूर्व 'मास्टरस्ट्रोक' ?**

पाटोदा नगरपंचायतीवर आमदार सुरेश आण्णा धस यांचे वर्चस्व असल्याचे मानले जाते. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सामाजिक समतोल राखत विरोधकांना राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न या निवडीमधून दिसून येतो. एकच फेरबदल करत अनेक पातळ्यांवर संदेश देणारी ही चाल पाटोद्यातील आगामी राजकीय समीकरणांसाठी निर्णायक ठरणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.


### जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **साचीन युवराज कदम** व **नितीन यवुराज कदम**, रा. अशोक नगर, बार्शी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि. बीड येथे आहे. ती जमीन. ६५ गुंठे हि संपूर्ण जमीन ही गट नं. १४ मध्ये आहे एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम काही दिवसापूर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभूल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवून ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बार्बीसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देनार.

जाहिर प्रगटन देणार
**साचीन युवराज कदम**
मो.नं. ९०७५९६९१६०

16635/12988

### जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **किसन साळुजी कदम**, रा. अशोक नगर, बार्शी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि. बीड येथे आहे. ती जमीन ६५ गुंठे हि संपूर्ण जमीन ही गट नं. १४ मध्ये आहे एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम काही दिवसापुर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभूल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवुन ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बार्बीसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देनार.

जाहिर प्रगटन देणार
**किसन साळुजी कदम**
मो.नं. ९५४५४१८४२२

16633/12984

### जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **दशरथ साळुजी कदम**, रा. अशोक नगर, बाशी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि. बीड येथे आहे. ती जमीन १हे/११आर हि संपुर्ण जमीन ही गट नं. १४ मध्ये आहे एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम काही दिवसापुर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभुल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवुन ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बाबींसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देनार.

जाहिर प्रगटन देणार
**दशरथ साळुजी कदम**
मो.नं. ८७९३८६९९२३

16637/12985

### जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **गोरख साळुजी कदम**, रा. अशोक नगर, बार्शी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि. बीड येथे आहे. तो जमीन भाऊ अशोक प्रकाश कदम, आई सुनंदा प्रकाश कदम आमचे नावे आहे. संपूर्ण जमीन ही आम्हा तिघांमध्ये ६५ गुंठे आहे गट नं. १४ मध्ये एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील लोकांची जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सोनु सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सोनु सुंदर कदम काही दिवसापुर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभुल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवुन ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बार्बीसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व माझा भाऊ अशोक प्रकाश कदम, आई सुनंदा प्रकाश कदम आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत.

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देनार.

जाहिर प्रगटन देणार
**गोरख साळुजी कदम**
मो.नं. ९०४९६२३८४६

16634/12987

### जमीन खरेदी न करण्याबाबतचे जाहिर प्रगटन

मी **अंकुश साळुजी कदम**, रा. अशोक नगर, बार्शी नाका, बीड माझी वडिलोपार्जित जमीन बीड तरफ जमीन देशमुख (९४३९४१) बीड ता.जि. बीड येथे आहे. ती जमीन १हे/११आर हि संपुर्ण जमीन ही गट नं. १४ मध्ये आहे एकुण आमची मालकी व ताब्यात जमीन आहे. सदरील जमीन ही वडिलोपार्जित असुन सदरील गटातील कसल्याही प्रकारची आमच्या भावकीमधील जमीनीचे वाटप झालेले नाही. सदरील जमीनी ही रस्त्याच्या बाजुचे जमीन अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम यांनी स्वतःचे नाव लावले आहे व सर्वांना अंधारात ठेवुन जमीनीचा मावेजा उचलेला आहे. त्या पध्दतीने शेत जमीनीवर जसे आहे तसे ताबा घेतलेला आहे. अशोक चंद्रसेन कदम व सुमन सुंदर कदम काही दिवसापुर्वी रोड लगत जमीनीवर ताबा असे दाखवुन शासनाची दिशाभुल करुन मावेजा उचलेला आहे.

सदरील त्यांची जमीन रोड लगत नाही, माझी जमीन रोड लगत आहे असे दाखवुन ते जमीन विकण्याचा प्रयत्नात आहेत. तसेच या जमीनीवर कोणतीही शासकीय योजना अथवा इतर बार्बीसाठी वापरु नये. सदरील जमीनीवर कोणतेही शासकिय, निमशासकीय, केंद्रशासीत योजनेसाठी घेऊ नये या जमीनीवर मंजुरी देण्यात येऊ नये. सदरील जमीन माझ्या व आमच्या ताब्यात व वहिती करत आहोत.

करीता गट नं. १४ तरफ देखमुख बीड येथील जमीनीबाबत कोणीही खरेदी विक्री अथवा भाड्याने सुद्या देऊ नये बक्षिसपत्र, दानपत्र न करणे बाबत जाहिर प्रगटन देनार.

जाहिर प्रगटन देणार
**अंकुश साळुजी कदम**
मो.नं. ७०५७२९८७६०

16636/12986

### मेजर मनोहर राऊत यांचे निधन

केज दि २७(प्रतिनिधी)- शहरातील (जुने केज हनुमान गल्ली ) येथे रहिवासी असलेले माजी सैनिक मेजर मनोहर राऊत यांचे आज अल्पशा



आजाराने दुःखद निधन झाले. मनोहर राऊत यांनी भारतीय सेनेत आपला सेवाकाळ पूर्ण केला. अत्यंत शांत स्वभावाचे मेजर मनोहर राऊत यांचा मोठा मित्रपरिवार आहे. ते सर्वांशी अत्यंत आपुलकीने व प्रेमाने वागत. मेजर राऊत यांचा अंत्यविधी शुकवार दि २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी पान २ वर


# पार्श्वभूमी

दि.२८ फेब्रुवारी २०२६ शनिवार पान ६


### संस्कार विद्यालयात काव्यगायन संपन्न

बीड (प्रतिनिधी )येथील संस्कार प्राथमिक विद्यालयात पाचवी ते सातवी विभागामध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कवयित्री सुवर्णा कुलकर्णी यांच्या काव्यगायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम उपस्थितांनी कवी कुसुमाग्रज आणि श्री सरस्वती देवी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी व्यासपीठावर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी यांची अध्यक्षस्थानी उपस्थिती होती. तसेच व्यासपीठावर विभागप्रमुख सुनील सोनवळकर यांचीही उपस्थिती होती

## गेवराई शहरातील छत्रपतींच्या पुतळ्याची जागा बदलण्याची प्रशासनाकडून विनंती

# ‘पुतळा जैसे थे’ ठेवण्यासाठी शिवप्रेमी आक्रमक

**गेवराई दि.२७(प्रतिनिधी):–गेवराई शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात नुकताच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा शिवप्रेमींच्या पुढाकारातून उभारण्यात आला. रात्रीच्या वेळी गणिमी काव्याच्या पद्धतीने पुतळ्याची स्थापना करून अनावरण करण्यात आल्याने शहरात एक वेगळाच उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत आनंद व्यक्त केला आहे.**

मात्र या पुतळ्याची उभारणी ज्या ठिकाणी करण्यात आली आहे, ते ठिकाण राज्य महामार्गाच्या मध्यभागी येत असल्याचे कारण पुढे करत नगरपरिषद प्रशासनाने तो अन्यत्र हलविण्याचा प्रस्ताव मांडला आहे. रस्ते वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता पुतळ्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची तयारी प्रशासनाने दर्शविली आहे. यासाठी शिवप्रेमींशी वेळोवेळी बैठका घेऊन समन्वय साधण्याचा प्रयत्नही करण्यात येत आहे.

दरम्यान, पुतळा हलविण्याच्या चर्चेमुळे शिवप्रेमींमध्ये अस्वस्थता वाढली असून या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविण्यात येत



आहे. शुक्रवारी मोठ्या संख्येने शिवप्रेमी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमले. तेथून त्यांनी नगरपरिषद कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाच्या भूमिकेविरोधात घोषणाबाजी केली. छत्रपतींचा पुतळा ज्या ठिकाणी बसविला आहे, तो तिथेच राहिला पाहिजे ; हलविण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा ठाम आणि आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला.

या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी शिवप्रेमींच्या भावना समजून घेत संवाद साधण्याचा प्रयत्न केला. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत सर्वानुमते तोडगा काढण्यासाठी प्रशासन सकारात्मक असल्याचे पान २ वर

## श्रीयोगेश्वरी देवीच्या मंदिरासाठी एका भक्ताने दिली एक कोटी रुपयांची देणगी

अंबाजोगाई दि २७ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरासाठी एका मुंबईस्थित भक्ताने तब्बल एक कोटी रुपयांची भरघोस देणगी दिली आहे. मंदिराच्या शंभर वर्षे जुन्या शिखराच्या जिर्णोद्धारासाठी ही रक्कम देण्यात आली असून, विशेष म्हणजे संबंधित देणगीदाराने आपले नाव गुप्त ठेवण्याची अट घातली आहे.

योगेश्वरी देवीच्या मंदिराचे सध्याचे मुख्य शिखर शंभरवर्षांपूर्वीचे आहे.हे शिखर पूर्णपणे चुन्याच्या बांधकामात असल्याने काळाच्या ओघात ते काहीसे कमकुवत झाले होते. या ऐतिहासिक शिखराचा जिर्णोद्धार करण्याचा निर्णय योगेश्वरी देवस्थान समितीने नुकताच घेतला होता. या कामासाठी साधारण ८० ते ९० लाख रुपयांचा पान २ वर



## माजलगावात रोडरोमिओंचा उच्छाद, पोलिसांचे दुर्लक्ष

**माजलगाव दि.२७(प्रतिनिधी)– शहरामध्ये रोडरोमिओंचा उच्छाद वाढला असुन याकडे पोलिसांचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे रोमिओंचा सर्वत्र वावर वाढला असुन त्यांचेवर वेळेवर कारवाई न झाल्यास एखादी घटना देखिल घडु शकते. त्यामुळे पोलिसांनी रोमिओंचा रोड शो करावा अशी मागणी पालकांसह सर्वसामान्यांतुन होत असुन विवीध आवाजाच्या दुचाकींच्या कर्णकर्कस आवाजाने मुलींसह पादचाकरी कंटाळले असुन त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.**

**पोलिसांनी रोमिओंचा रोड शो करावा**

**विवीध आवाजाच्या दुचाकींनी मुलींसह पादचारी कंटाळले**

शहरातील सुंदरराव सोळंके महाविद्यालय,सिद्धेश्वर महाविद्यालय, सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय,महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, जवाहर माध्यमिक विद्यालय,छत्रपती माध्यमिक विद्यालय,राजस्थानी माध्यमिक विद्यालय, व विविध शाळा महाविद्यालये तसेच शिकवणी वर्ग असलेल्या परि काही दिवसांपासून रोडरोमिओंकडून विद्यार्थिनीची छेड काढण्याच्या प्रकारात लक्षणीय वाढ झाली आहे . तसेच शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत शहरातील काही १५ ते १७ वयोगटातील मुले विद्यार्थिनींची छेड काढताना दिसून येत आहेत . वाहन परवाना नसताना ट्रिपल सीट , दुचाकी धूम स्टाइलने चालवितात . या मुलांकडून शाळेत ये - जा करणाऱ्या विद्यार्थिनींना शेरेबाजी करून पान २ वर

## उखंडा परिसरातील चार वळूंचा बंदोबस्त करा

### विश्वनाथ हुले पाटील यांची मागणी

पाटोदा दि. २७(प्रतिनिधी):- उखंडा गाव व परिसरात मोकाट फिरणाऱ्या चार वळूंमुळे शेतकरी व शेतमजुरांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून या वळूंचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी अश्विनी पेट्रोल पंपाचे संचालक विश्वनाथ हुले पाटील यांनी ग्राम विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय उखंडा यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, उखंडा व परिसरात मोकाट फिरणारे चार वळू दिवसा तसेच रात्री शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विशेष म्हणजे एखादा पुरुष किंवा स्त्री एकटी दिसल्यास अधिक आक्रमकपणे धावून जाण्याचे प्रकार घडत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शिवरातील शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांवरही हल्ला करण्याचा प्रयत्न होत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी व ग्रामस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर चारही वळूंचा ग्रामपंचायतीमार्फत तातडीने बंदोबस्त करावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

## बशीरगंज रमजान ईद उत्सव समितीची कार्यकारीणी जाहीर

बीड दि. २७(प्रतिनिधी):- दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बशीरगंज ईद उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जात आहे. या उत्सव समितीची कार्यकारणी दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडण्यात आली आहे.

कार्यकारणीची अध्यक्षपदी शेख खलील (बब्बु) शेख जमील, उपाध्यक्ष अख्तर फारूकी फरहत फारूकी, सचिव सय्यद मिनाज सय्यद सिद्दीक, सहसचिव शेख शफीक तसेच सदस्य म्हणून शेख सादेक, सय्यद शहाबाज, सय्यद सिद्दीकी, सोहेल खान, आदिल कादरी, शेख पाशा, सर्फराज कादरी, युसूफ खान, अजीम चौधरी, अमजद पाशा, जुनेद बागवान, बाबा खान, मिरान फारूकी, अक्सर खान, शेख अखील शेख बाबा, चन्ना इनामदार, मुखीद बागवान, आबेद बागवान, आगा खान, मुदसीर काझी, शेख अनीस, अख्तर फारूकी, अब्दुल लतीफ, सय्यद अमजद अली, सय्यद मसुद, खिजर





फारूकी, अमन फारोखी आदींची निवड करण्यात आली. यात मार्गदर्शक म्हणून सय्यद जाफर, अमजद खान, सिद्दीक फारूकी, सय्यद अजीम, कामरान पटेल, नदीम इनामदार हे आहेत. सर्व नवनिर्वाचित कार्यकारीणीचे अभिनंदन होत आहे.

### पोलीस पाटील भरती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

## संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी-अॅड.डोंगरे

माजलगांव दि.२७ (प्रतिनिधी):-उपविभागीय कार्यालय माजलगाव अंतर्गत होत असलेल्या पोलीस पाटील भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप करत बहुजन समाज पार्टीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. संबंधित प्रकरणात छत्रपती संभाजीनगर येथील एम. टेक मल्टी सर्विसेस या कंपनीवर प्रचलित नियमानुसार गुन्हा



दाखल करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.उपविभाग माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांसाठी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली होती. मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर पान २ वर

## मंगलनाथ मल्टिपलवर ठेवीदारांनी केला गुन्हा दाखल

### चेअरमन केशव पंडितसह संचालक फरार

गेवराई दि.२७(प्रतिनिधी):-जादा व्याजाचे आमिष देवून एक कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्र करणी येथील श्री मंगलनाथ अर्बन मल्टिपल निधीचे चेअरमन केशव पंडित व संचालक यांच्या विरुद्ध गेवराई पोलिस स्टेशनमध्ये अखेर गुन्हा दाखल करण्यात आला असून चेअरमन व संचालक फरार झाले आहेत.

महाराष्ट्र ठेवीदारांचे वित्तीय संस्थांमधील हितसंबंधा चे संरक्षण ४ व ३ भारतीय न्याय संहिता कलम ६१ ( २ ) , ३१८ (२),३१६(८),३१६(२) अन्वये जादा व्याज देण्याच्या आमिषाने चेअरमन केशव पंडित व संचालक शीला पोपळघट , योगिता पंडित यांच्याविरुद्ध गेवराई ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.अॅड.बाबासाहेब घोक्षे व ११ ठेवीदारांनी ही फिर्याद दिली.११ ठेवीदारांचे एकूण १ कोटी ७ लाख ९७ हजार ५०० रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याची माहिती फिर्यादीमध्ये देण्यात आली आहे.दरम्यान चेअरमन केशव पंडित व इतर संचालक फरार झाले आहेत.



माजलगांव- एकादशीच्या निमित्ताने ह.भ.प श्री बाळुमहाराज गिरगावकर यांनी परमेश्वर (बप्पा)सोळंके मा.चेअरमन माजलगाव खरेदी विक्री संघ यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता सोळंके परिवाराच्या वतीने सत्कार करण्याचा आला

### उन्हाची तिव्रता जाणवु लागली

बीड दि.२७(प्रतिनिधी):- सध्या दोन- चार दिवसांपासुन उन्हाची तिव्रता वाढु लागल्याने दुपारच्या वेळी रस्ते सामसुम दिसुन येत असुन नागरीकही घराच्या बाहेर निघतांना दिसुन येत नाही.

### महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपीस सहा महिण्याची शिक्षा

बीड दि २७(प्रतिनिधी)- पिडित महिलेचा वाईट हेतुने हात धरून व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी शिरूर तालुक्यातील रा. पाडळी या गावचा रहिवासी असलेला आरोपी नामे दत्ता भिमराव दुधाळ यास जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ व्ही.एच. पाटवदकर यांनी दोषी ठरवून ६ महिने करावास व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास एवढया दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अॅड.अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.



अॅड.अजय तांदळे

या प्रकरणी थोडक्यात हकिगत अशी की, दि.१डिसेंबर २०२० रोजी दुपारी अंदाजे बारा वाजण्याचे सुमारास पिडिता पाणी पाडळी येथील सरकारी बोर वरून पाणी भरून घरी जात असतांना आरोपी नामे दत्ता भिमराव पान २ वर

### न.प.च्या अर्थसंकल्पीय बैठकीत

## बीडकरांच्या प्रश्नांवर डॉ.सारिकाताईंनी वेधले लक्ष

बीड दि.२७(प्रतिनिधी):- बीड नगरपरिषदेची अर्थसंकल्पीय बैठक शुक्रवारी (दि.२७) पार पडली. या बैठकीत भाजपच्या गटनेत्या नगरसेविका डॉ.सारिका योगेश क्षीरसागर यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भात विविध महत्त्वाचे मुद्दे व प्रस्ताव मांडले. बैठकीस समिती अध्यक्ष, नगरसेवक, नगरपरिषद प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



अर्थसंकल्पीय बैठकीत डॉ.सारिका क्षीरसागर म्हणाल्या, माजी सैनिकांना घरपट्टी व नळपट्टी नियमानुसार माफ करावी. वाढत्या शहराचा विचार करता पश्चिम बीड शहरासाठी नवीन अग्निशमन केंद्र प्रस्तावित करावे. नवीन भाजी मंडई, फुटमार्केट, स्मशानभूमी, बौद्धविहार आणि डी.पी. रोड प्रस्तावित पान २ वर

### तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या नियोजनातून

## पाटोद्यात छत्रपती शिवाजी महाराज महसूल राजस्व समाधान शिबिराची दमदार आखणी

पाटोदा : राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेतून सुरू झालेल्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल राजस्व समाधान शिबिरा’ची पाटोदा तालुक्यात अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात हे अभियान राबविले जात असून, पाटोद्यात तहसीलदार दत्तात्रय निलावाड यांच्या नेतृत्वाखाली मोहिमेला गती देण्यात आली आहे.



बीड येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली सर्व तहसीलदार व महसूल अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. त्यानंतर पाटोदा तालुक्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले असून १०७ गावांसह गावांतर्गत वाड्या-वस्त्यांवर चावडी वाचनाद्वारे अभियानाची माहिती पोहोचविण्यात येत आहे.

अभियानाचे नियोजन तीन टप्प्यांत करण्यात आले असून ७ ते १४ मार्चदरम्यान मंडळ स्तरावरील शिबिरे, १० ते १७ एप्रिलदरम्यान विशेष मार्गदर्शन शिबिरे आणि १८ एप्रिल ते १५ मेदरम्यान नगरपंचायत स्तरावर शहर भागासाठी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. या शिबिरांत ३२ सज्जातील तलाठी, पाच मंडळ अधिकारी तसेच महसूल विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी होणार आहेत. उपविभागीय अधिकारी श्रीमती सीमा शेख यांची उपस्थिती राहणार असून वन, कृषी व भूमी अभिलेख विभागांचे अधिकारीही या अभियानात सहभागी होणार आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतील ‘सेवामित्र’ पान २ वर

## सारिका क्षीरसागर यांचा अभिष्टचिंतन सोहळा सामाजिक उपक्रमातून साजरा

### रोहित राऊत व नामदेव म्हेत्रे यांच्याकडून शालेय साहित्य वाटप

नाळवंडी दि.२७(प्रतिनिधी):-बीड भाजपनेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या सौभाग्यवती तथा उत्कृष्ट राज्यकर्त्या सारिका क्षीरसागर यांचा काल अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला तर याच अभिष्टचिंतन सोहळयाच्या निमित्ताने बीड तालुक्यामध्ये अनेक वेगवेगळे सामाजिक उपक्रम घेत त्यांच्या समर्थकांनी हा अभिष्टचिंतन सोहळा साजरा केला तर याच अभिष्टचिंतन सोहळयाच्या निमित्ताने बीड तालुक्यातील नाळवंडी या ठिकाणी कुठलेही बॅनरबाजी किंवा इतरत्र नुकसानीचा खर्च न करता शालेय साहित्य वाटप हा सामाजिक



बांधिलकी जोपासणारा उपक्रम प्राथमिक आश्रम शाळा या शाळेमध्ये रोहित राऊत व नामदेव म्हेत्रे या दोन निष्ठावंत सहकाऱ्यांनी केला तर या केलेल्या कार्याबद्दल त्यांचे याच शाळेतील शिक्षक वृंदांकडून तसेच ग्रामस्थांकडून कौतुक केले जाऊ लागले आहे तर यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक वृंदासह नारायण राऊत,अमोल राऊत, विशाल म्हेत्रे, गजानन राऊत, सतीश माळवदे, आकाश कानडे,बाबाजी तावरे व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

CMYK